**नवी मुंबई महानगरपालिका**
**महापालिका सर्वसाधारण सभा**

महानगरपालिकेच्या **बुधवार, दिनांक २२ ऑगस्ट २०१२ रोजी दुपारी ३.०० वाजता** भरलेल्या माहे ऑगस्ट महिन्याच्या सर्वसाधारण मासिक तहकूब सभेतील **मंजूर/नामंजूर** इ. ठरावाची माहिती संक्षिप्त आणि मसुदा स्वरुपात खालीलप्रमाणे आहे :-

| | |
|---|---|
| **विषय क्र. २.**<br>**दि. १६ ऑगस्ट २०१२** | **परिवहन समितीचा दिनांक २७/०७/२०१२ चा ठराव क्र. ५:-**<br>"संदर्भ :- परिवहन व्यवस्थापक यांचे दिनांक ०१/०६/२०१२ चे पत्र क्र.नमुंमपा/परि/व्यव/११७/२०१२.<br>"महानगरपालिकेला अशी शिफारस करण्यात यावी की, परिवहन उपक्रमाच्या वातानुकूलित आणि सर्वसाधारण बसच्या तिकीटदरामध्ये,उपरोक्त पत्रासमवेत जोडलेल्या परिशिष्ट "अ" मध्ये सुचविलेले दर व परिशिष्ट "ब " व"क "मध्ये सुचविल्याप्रमाणे वाढ करण्यास,मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ३४३(१) अन्वये,सुचविल्याप्रमाणे,मंजुरी देण्यात यावी.मात्र,सदर सुधारीत दराची अंमलबजावणी,प्रादेशीक परिवहन प्राधिकरण त्यास ज्या दिनांकास मंजुरी देईल, त्यानंतरच्या दिनांकापासून करण्यात यावी." |
| **ठराव क्र. १४५९.**<br>**दि.२२ ऑगस्ट २०१२** | "परिवहन उपक्रमाच्या वातानुकुलित आणि सर्वसाधारण बसच्या तिकिटदरामध्ये,उपरोक्त पत्रासमवेत जोडलेल्या परिशिष्ट अ सुचविलेले दर व परिशिष्ट ब व क मध्ये सुचविल्याप्रमाणे वाढ करण्यास,मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ३४३(१) अन्वये,सुचविल्याप्रमाणे,मंजुरी देण्यात यावी.मात्र,सदर सुधारीत दराची अंमलबजावणी, प्रादेशीक परिवहन प्राधिकरण त्यास ज्या दिनांकास मंजुरी देईल,त्यांनतरच्या दिनांकापासून करण्यात यावी." |
| **निर्णय -** | **मंजूर** |
| **विषय क्र. ३.**<br>**दि. १६ ऑगस्ट २०१२** | चार नविन नागरी आरोग्य केंद्र सुरु करण्याच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक ३०/०७/२०१२ चे पत्र क्र.नमुंमपा/आरोग्य/२२०६/२०१२ |
| **ठराव क्र. १४६०.**<br>**दि.२२ ऑगस्ट २०१२** | "आयुक्तांच्या उपरोक्त पत्रामध्ये तपशिलवार नमुद केल्याप्रमाणे नविन चार नागरी आरोग्य केंद्र सुरु करण्याच्या धोरणातमक निर्णयास आणि त्यासंबंधातील होणा-या एकूण रक्कम रु. ४ कोटी ३० लक्ष इतक्या खर्चास, सुचविल्याप्रमाणे, प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय -** | **मंजूर** |

| | |
|---|---|
| **तांतडीचे कामकाज क्र. २४४**<br>**दि. १६ ऑगस्ट २०१२** | नगरसेवक श्री.संतोष शेट्टी प्रभाग क्र.७२ व नगरसेविका श्रीमती अनिता संतोष शेट्टी प्रभाग क्र.७४ यांना मुं.प्रा.मं.अधिनिय,१९४९ च्या कलम १० (१ड) च्या तरतुदी लागू झाल्या असल्यामुळे सदर बाब मा.सर्वसाधारण सभेपुढे योग्य त्या निर्णयासाठी ठेवणेबाबत. |
| **ठराव क्र. १४८६.**<br>**दि.२२ ऑगस्ट २०१२** | "आयुक्तांच्या उपरोक्त पत्रात नमुद केल्याप्रमाणे आणि जोडपत्र अ, ब, क, ड, इ मध्ये तपशिलवार दिल्याप्रमाणे प्रभाग क्र.७२ चे नगरसेवक श्री.संतोष देवप्पा शेट्टी व प्रभाग क्र.७४ च्या नगरसेविका श्रीमती अनिता संतोष शेट्टी यांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम,१९४९ च्या कलम १० (१ड) च्या तरतुदी लागू झाल्या असलेबाबत कळविले आहे. त्या अनुषंगाने महापालिका सचिव विभागाच्या माध्यमातून संदर्भ क्र. २ व ३ चे पत्र संबंधीत नगरसेवकांना देण्यात आले होते. त्यास अनुसरुन प्रभाग क्र. ७२ चे नगरसेवक श्री. संतोष देवप्पा शेट्टी व प्रभाग क्र. ७४ च्या नगरसेविका श्रीमती अनिता संतोष शेट्टी यांनी या कार्यालयास खुलासा सादर केलेला आहे. सदर खुलाशात त्यांनी अनाधिकृत बांधकाम/वाढीव बांधकाम केल्याचे अमान्य केले आहे.त्यामुळे उपरोक्त सदस्य, पालिका सदस्य म्हणुन पद धारण करण्यास वाद उदभवला आहे. या कारणास्तव मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १२ अन्वये सदरचे प्रकरण न्यायाधिशाकडे पाठविण्यास आयुक्तांना विनंती करण्यात यावी आणि या प्रस्तावास मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय -** | **मंजूर.** |
| **तांतडीचे कामकाज क्र. २४८**<br>**दि. १६ ऑगस्ट २०१२** | नवी मुंबई महानगरपालिकेच्या विद्यमान विकास नियंत्रण नियमावलीमध्ये मिश्र वापर तसेच वापर बदल अनुज्ञेय करणेबाबतचे नियम अंतर्भुत करणेबाबतचा मा.सर्वसाधारध सभेत दि.२४/०९/२०१० रोजीच्या पत्रान्वये सादर केलेला प्रस्ताव मागे घेणेबाबत तसेच जनहित याचिका क्र.११०/२००९ मध्ये मा.उच्च न्यायालय,मुंबई कडील दि.०२/०८/२०१२ रोजीच्या अंतरिम आदेशानुसार मा.न्यायालयाचा आदेश तसेच याचिकाकर्त्या यांचे निवेदन अवलोकनासाठी ठेवणेबाबत. |

| | |
|---|---|
| **<u>ठराव क्र. १४८७.</u>**<br>**दि.२२ ऑगस्ट २०१२** | "नवी मुंबई महानगरपालिकेच्या आस्थापनेवर विद्यमान विकास नियंत्रण नियमावलीमध्ये मिश्र वापर तसेच वापर बदल अनुज्ञेय करणेबाबतचे नियम अंतर्भुत करणेबाबतचा मा.सर्वसाधारण सभेत दि.२४/०९/२०१२ रोजीच्या पत्रान्वये सादर केलेला प्रस्ताव मागे घेणेबाबत तसेच जनहित याचिका क्र.११०/२००९ मध्ये मा.उच्च न्यायालय,मुंबई कडील दि.०२/०८/२०१२ रोजीच्या अंतरिम आदेशानुसार मा.न्यायालयाचा आदेश तसेच याचिकाकर्त्या यांचे अवलोकनासाठी सादर केलेले निवेदन **<u>दफ्तरी दाखल</u>** करण्यात यावे." |
| **निर्णय -** | **<u>मंजूर.</u>** |

**महानगरपालिकेने मंजूर केलेल्या आणि उचित कार्यवाहीसाठी मा. आयुक्तांकडे पाठविलेल्या**

**सन्मा. नगरसेवकांच्या ठरावांची यादी**

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| १. | **सौ. माधुरी सुतार, यांजकडून :-** शिरवणे गावचे व परिसरातील रहिवाश्यांचे आराध्य दैवत स्वयंभू गणेशमंदिर हे असुन परिसरातील भाविक मोठया प्रमाणामध्ये सदर मंदिरामध्ये दर्शनासाठी येत असतात.महापालिकेने नेरुळ येथील सेक्टर-०९ येथे शनिमंदिरासाठी ज्या पध्दतीने प्रवेशव्दार उभारलेले आहे.त्यानुसार शिरवणे अंडरपासच्या अगोदरच्या अगोदरच्या रस्तेवर प्रवेशव्दार उभारावे. | ०४ / ऑगस्ट | २२/०८/२०१२ | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| २. | **सौ. माधुरी सुतार, यांजकडून :-** शिरवणे प्रभागामध्ये राजीवगांधी उडडाणपुलाजवळ एन.एम.एम.टी. बस थांबा आहे त्याच पध्दतीने शिरवणे गावाच्या चिंचेच्या झाडाजवळ बस थांबे आहेत परंतु सदर ठिकाणी प्रवाशांना उभे राहणे करिता अदयाप तेथे बस थांबा नाही तरी या दोन्ही ठिकाणी प्रवेशांसाठी बस थांबे बनवावे. | ०५ / ऑगस्ट | २२/०८/२०१२ | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| ३. | **सौ. माधुरी सुतार, यांजकडून :-** न.मुं.म.पा. क्षेत्रामध्ये मुळगावठाणमध्ये मोठया प्रमाणात अनाधिकृत बांधकाम होत असुन पुर्वी ग्रामपंचायतकालीन असलेले रस्ते अनाधिकृत कामामुळे अरुंद होत आहेत.या वर उपाययोजना म्हणुन नव्या मुंबईतील मुळगावाचा विकास आराखडा तयार करुन ठिकठिकाणी नियोजित रस्ता बनवून सांकेतिक खुना कराव्या जेणेकरुन त्या खुनेच्या अलिकडे रहिवाशी अनाधिकृत बांधकाम करणार नाही.तरी यावर योग्य ती उपाययोजना करावी. | ०६ / ऑगस्ट | २२/०८/२०१२ | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४. | **सौ. कोमल सोमनाथ वास्कर, यांजकडून :-** सानपाडा प्रभाग क्र. ६३,मधील पारसिक बँकेजवळील चौक हा सानपाडा विभागाची मुख्य बाजारपेठ म्हणुन ओळखला जातो.सदर चौकाजवळ स्वामी विवेकानंद हे विदयालय असल्यामुळे सदर ठिकाणी दिवसभर ऐनकेन प्रकारे रहिवाशीयांची वर्दळ असते.परंतु या ठिकाणी लघुशंकेसाठी कोणतीच उपाययोजना नसल्यामुळे रहिवाशीयांची फार मोठी गैरसोय होत आहे.तरी सानपाडा से.४ येथील जलकुंभाजवळ मुतारी बांधणे. | ०७<br>ऑगस्ट | १४६१<br>२२/०८/२०१२ | मंजूर |
| ५. | **सौ. कोमल सोमनाथ वास्कर, यांजकडून :-** सिडकोने नवी मुंबईतील भुसंपादित शेतक-यांना १२.५ टक्के प्रमाणे विकसित भुखंड दिला.परंतु नवी मुंबईतील बहुतांश प्रकल्पग्रस्तांनी सदर भुखंड बांधण्याची आपली ऐपत नसल्यामुळे विकासकांना ५०/५० तत्वावर बांधण्यासाठी करार पत्रक तयार करुन दिला.सदर भुखंडावर विकासकाने नमुंमपा नगररचना विभागाकडुन बांधकाम परवानगी घेतल्यानंतर, बांधकाम पुर्ण केले.परंतु बांधकाम पुर्ण केल्यानंतर बहुतांशी विकासकांनी बांधकाम पुर्णत्वाचा दाखला (भोगवटा प्रमाणपत्र) न घेतल्यामुळे,या सर्व बांधकामांना पॅनल्टीच्या रुपाने लाखो रुपयांचे थकीत मालमत्ता कर पाठविण्यात आले आहे. त्यामुळे सर्व प्रकल्पग्रस्त चिंताग्रस्त आहे. तरी नवी मुंबई महानगरपालिकेने सदर करात सुट देऊन,या सर्व बांधकामांना बांधकाम पुर्णत्वाचा दाखला (भोगवटा प्रमाणपत्र) द्यावा. | ०८<br>ऑगस्ट | १४६२<br>२२/०८/२०१२ | मंजूर |
| ६. | **श्री. रामअशिष राजबली यादव, यांजकडून :-** प्र. क्र. ०६ यादवनगर देवीधामनगर येथे देवीमंदिर ते एम.आय.डी.सी.रोड पर्यंत डांबरीकरण व दोन्ही बाजु गटार व पदपथ बनवणे. | ०९<br>ऑगस्ट | २२/०८/२०१२ | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ७. | **श्री. रामअशिष राजबली यादव, यांजकडून :-** प्र. क्र. ०६ यादवनगर येथे हनुमानमंदिर ते एम.आय.डी.सी.लाईन पर्यंत गटार,रोड,पदपथ बनवणे. | १० / ऑगस्ट | २२/०८/२०१२ | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| ८. | **श्री. रामअशिष राजबली यादव, यांजकडून :-** प्र. क्र. ०६ यादवनगर येथे गुलाब तबेलाजवळ न.मुं.म.पा.शौचालय ते मस्जिद पर्यंत गटार,रोड,पदपथ बनवणे. | ११ / ऑगस्ट | २२/०८/२०१२ | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| ९. | **श्री. सुरेश जी. शेटटी, यांजकडून :-** नेरुळ सेक्टर -३,येथील रस्ते संपुर्ण खराब झाले असुन त्याची सुधारणा करणे. | १२ / ऑगस्ट | १४६३ / २२/०८/२०१२ | मंजूर |
| १०. | **श्री. सुरेश जी. शेटटी, यांजकडून :-** नेरुळ सेक्टर -२९,येथील फेरीवाला भुखंड जवळील गटार व पदपथ संपुर्ण खराब झाले असुन गटार व पदपथाची सुधारणा करणे. | १३ / ऑगस्ट | १४६४ / २२/०८/२०१२ | मंजूर |
| ११. | **श्री. सुरेश जी. शेटटी, यांजकडून :-** नेरुळ सेक्टर -१,येथील एन.एल.५ जवळील गटार व पदपथ संपुर्ण खराब झाले असुन गटार व पदपथाची सुधारणा करणे. | १४ / ऑगस्ट | १४६५ / २२/०८/२०१२ | मंजूर |
| १२. | **श्री. काशिनाथ जनार्दन पाटील, यांजकडून:-** नमुंमपा क्षेत्रामध्ये मेडिकल व इंजिनिअरिंग कॉलेज महानगरपालिकेच्या वतीने सुरु करणे. | १५ / ऑगस्ट | १४६६ / २२/०८/२०१२ | मंजूर |
| १३. | **श्री. काशिनाथ जनार्दन पाटील, यांजकडून:-** नमुंमपा क्षेत्रामध्ये असलेल्या सर्व संबंधित विभाग कार्यालयामध्ये काम करणा-या सर्व प्रथम श्रेणी ते चतुर्थ श्रेणी कर्मचा-यांची नांवे व फोन नंबर असलेली पाटी त्या त्या कार्यालयाच्या प्रवेशव्दारावर लावणे. | १६ / ऑगस्ट | १४६७ / २२/०८/२०१२ | मंजूर |
| १४. | **श्री. काशिनाथ जनार्दन पाटील, यांजकडून:-** नमुंमपा क्षेत्रामध्ये काम करणा-या सर्व कर्मचा-यांना महापालिकेचा ड्रेस कोड सक्तीचा करण्यात यावा व ओळखपत्र सक्तीचे करणे. | १७ / ऑगस्ट | १४६८ / २२/०८/२०१२ | मंजूर |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १५. | **सौ. रेखा विनोद म्हात्रे, यांजकडुन :-** प्र.क्र. ८९ करावे मधील सेक्टर ४४ मधील पाण्याच्या टाकी मध्ये सेक्टर ४४ व ४४ ए मधील इमारतींना पाणीपुरवठा उच्चदाबाने होण्यासाठी १५० हॉर्स पॉवरचे पंप बसविण्यात यावे व करावे गावातील तलावाजवळील पाण्याच्या टाकीमध्ये करावे गावातील घरांना पाणीपुरवठा उच्च दाबाने होण्यासाठी ७५ हॉर्स पॉवरचे पंप बसविणे. | १८<br>ऑगस्ट | २२/०८/२०१२ | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| १६. | **सौ. रेखा विनोद म्हात्रे, यांजकडुन :-** प्र. क्र.८९ करावे गावातील जुन्या झालेल्या पाण्याच्या पाईप लाईन तसेच वाढत्या लोकसंख्येच्या प्रमाणात कमी व्यासाच्या पाईप लाईन बदलुन मोठया व्यासाच्या पाईप लाईन टाकणे व गटाराखालुन गेलेल्या पाईप लाईन बदलणे. | १९<br>ऑगस्ट | २२/०८/२०१२ | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| १७. | **सौ. रेखा विनोद म्हात्रे, यांजकडुन :-** प्र. क्र.८९ करावे मधील सेक्टर ४४ मधील पाण्याच्या टाकीच्या परिसरात लेबर रुम,गोडाऊन व इतर दुरुस्तीचे कामे तसेच गावातील विहिरींची दुरुस्ती करणे. | २०<br>ऑगस्ट | २२/०८/२०१२ | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| १८. | **सौ. मोनिका लक्ष्मीकांत पाटील, यांजकडुन :-** प्र. क्र.२१,घणसोली गांव हे स्वातंत्र्य सैनिकांचे वारसा लाभलेले गाव आहे.या गावाची ओळख म्हणुन तसेच येथील स्वातंत्र्य सैनिकांचा सन्मान म्हणुन घणसोली नाका आणि दुस-या ठिकाणी तळवली नाका येथे गावाची ओळख पटविणारे नावाचे प्रवेश व्दार उभारणे. | २१<br>ऑगस्ट | १४६९<br>२२/०८/२०१२ | मंजूर |
| १९. | **सौ. मोनिका लक्ष्मीकांत पाटील, यांजकडुन :-** प्र. क्र.२१,तळवली नाका येथे आंबेडकर चौक आणि मच्छीमार्केट येथे हायमास्ट लावणे. | २२<br>ऑगस्ट | १४७०<br>२२/०८/२०१२ | मंजूर |
| २०. | **सौ. मोनिका लक्ष्मीकांत पाटील, यांजकडुन :-** प्र.क्र.२१,येथे अंतर्गत उर्वरित रस्त्यांचे डांबरीकरण करुन सुधारणा करणे. | २३<br>ऑगस्ट | १४७१<br>२२/०८/२०१२ | मंजूर |
| २१. | **श्री. किशोर अशोक पाटकर, यांजकडुन :-** नमुमपाने पासपोर्ट कार्यालय,रेल्वे,पोस्ट कार्यालय व इतर शासकिय संस्थाप्रमाणे जास्त शुल्क आकारुन तत्काळ सेवा केंद्र लवकरात लवकर सुरु करणे. | २४<br>ऑगस्ट | २२/०८/२०१२ | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २२. | **श्री. किशोर अशोक पाटकर, यांजकडुन :-** नमुंमपाने आपल्या आस्थापनात संरचनात्मक अभियंता (Structural Engineer) ची नेमणुक करावी. | २५ ऑगस्ट | २२/०८/२०१२ | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| २३. | **श्रीम. स्वाती अ.गुरखे, यांजकडुन :-** प्र. क्र.८२,सेक्टर ११ विभागातील बेलापुर रेल्वे स्टेशन ते आय.डी.बी.आय.बँक या ठिकाणी मोठया प्रमाणात ऑफिस असल्या कारणे सदर रस्ता ओलांडण्याकरीता पादचारी पुल बनविणे. | २६ ऑगस्ट | १४७२ २२/०८/२०१२ | मंजूर |
| २४. | **श्रीम. स्वाती अ.गुरखे, यांजकडुन :-** प्र. क्र.८२,विभागात मुंबई -पुणे हायवे ते महाकाली चौक या रस्त्यावर गाडयांची मोठया प्रमाणात वर्दळ असते.तरी सदर मुंबई-पुणे हायवे ते महाकाली चौक या रस्त्याचे काँक्रीटीकरण करणे. | २७ ऑगस्ट | १४७३ २२/०८/२०१२ | मंजूर |
| २५. | **श्रीम. स्वाती अ.गुरखे, यांजकडुन :-** प्र.क्र.८२,सेक्टर ६ विभागातील साई सावली उदयानात नागरिकांची मोठया प्रमाणात वरदळ असते.सदर उदयानात शौचालयाची कोणतीही सोय नसल्याने नागरिकांची मोठया प्रमाणात गैरसोय होत आहे.तरी सदर उदयानात शौचालय बांधणे. | २८ ऑगस्ट | १४७४ २२/०८/२०१२ | मंजूर |
| २६. | **श्री. बाळकृष्ण चाहु पाटील, यांजकडुन :-** खदनतलावामध्ये गार्डन (जॉगिंग ट्रॅकच्यालगत गार्डन) तयार करणे. | २९ ऑगस्ट | २२/०८/२०१२ | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| २७. | **श्री. बाळकृष्ण चाहु पाटील, यांजकडुन :-** राबाडा शाळा क्र.४७ च्या मधोमध गार्डन तयार करणे. | ३० ऑगस्ट | २२/०८/२०१२ | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| २८. | **श्री. बाळकृष्ण चाहु पाटील, यांजकडुन :-** न.मुं.म.न.पा. शाळा क्र.४७,राबाडा ही माध्यमिक शाळा करणे. | ३१ ऑगस्ट | २२/०८/२०१२ | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| २९. | **३२. श्री. मधुकर बाबु मुकादम, यांजकडुन :-** प्र. क्र.४०,येथे शाळेच्या आवारात असलेल्या अंगणवाडीची अत्यंत दुरावस्था झाली असुन ती मोडकळीस आली आहे.तरी ती वास्तु पाडुन त्याठिकाणी अंगणवाडी व त्यावर वाचनालय व व्यायामशाळा अशी इमारत बनविणे. | ३२ ऑगस्ट | १४७५ २२/०८/२०१२ | मंजूर |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३०. | **श्री. प्रभाकर मरीबा कांबळे, यांजकडुन :-** प्र. क्र.२३ श्रमिकनगर खैरणे एम.आय.डी.सी.येथे असलेल्या शाळा क्र.३९ येथे इ.८ वी चा नविन वर्ग झाल्या कारणे तेथे वर्ग अपुरा असल्यामुळे तेथील मोकळया जागेत नविन शाळा बनविण्यात यावी.सदर शाळा ही दोन मजल्यांची असावी. | ३३<br>ऑगस्ट | १४७६<br>२२/०८/२०१२ | मंजूर |
| ३१. | **श्री. प्रभाकर मरीबा कांबळे, यांजकडुन :-** श्रमिक नगर येथे असलेल्या पाण्याच्या टाकीची एक स्लॅब टाकुन तीची उंची वाढवणे सदर टाकीची उंची वाढविली तर स्थानिक लोकांना पाणी व्यवस्थित मिळेल. | ३४<br>ऑगस्ट | १४७७<br>२२/०८/२०१२ | मंजूर |
| ३२. | **श्री. प्रभाकर मरीबा कांबळे, यांजकडुन :-** प्र. क्र.२३ हनुमान नगर महापे येथे असलेल्या ग्लेनमार्क कंपनी लगतच्या गटारावर संपुर्ण स्लॅब टाकुन त्यावर दुमजली शौचालय बनवणे. | ३५<br>ऑगस्ट | १४७८<br>२२/०८/२०१२ | मंजूर |
| ३३. | **सौ. विजया रामचंद्र घरत, यांजकडुन :-** प्र. क्र.५८,तुर्भेगांव येथील रामतनु माता क्रीडांगण या मैदानासाठी महानगरपलिकेतर्फे मुख्य प्रवेशव्दार उभारणे. | ३६<br>ऑगस्ट | १४७९<br>२२/०८/२०१२ | मंजूर |
| ३४. | **सौ. विजया रामचंद्र घरत, यांजकडुन :-** प्र. क्र.५८,तुर्भेगांव मधील सेक्टर २४ येथील कृष्णा टॉवर,प्लॉट क्र.२२ ते २६ लगत असलेल्या १० फुट खोल असलेल्या बेसमेंटच्या वरील पालिकेच्या फुटपाथवर पादचा-यांची जास्त प्रमाणात वर्दळ असल्याने दुर्घटना होऊ नये म्हणुन फुटपाथवरसंरक्षक लोखंडी रॅलिंग बसविणे. | ३७<br>ऑगस्ट | १४८०<br>२२/०८/२०१२ | मंजूर |
| ३५. | **सौ. विजया रामचंद्र घरत, यांजकडुन :-** प्र. क्र.५८ तुर्भे मधील सेक्टर २२ येथील महानगरपालिकेने राखीव ठेवलेले लघुउदयोग भुखंड क्र.३९-२,ते ३९-३,३९-४ भुखंडावर पालिके मार्फत महिला बचत गटांकरिता लघुउदयोग केंद्र बांधणे. | ३८<br>ऑगस्ट | १४८१<br>२२/०८/२०१२ | मंजूर |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३६. | **श्री. अमित रमेश पाटील, यांजकडुन :-** बेलापुर से-१५ येथील क्रोमा शोरुमच्या मागे असलेल्या भुखंड क्र.३३ व ३४ या भुखंडावरील असलेले शाळेचे व खेळाचे मैदान असलेले आरक्षण काढुन तेथे फक्त खेळाचे मैदान म्हणुन आरक्षण ठेवण्याचे सिडकोला कळविण्यात यावे जेणे करुन तेथे कित्येक वर्षे बेलापुर,शहाबाज,फणसपाडा,दिवाळेगाव तसेच सेक्टर खेळणा-या मुलांना तसेच तेथील राहणा-या नागरिकांना त्याचा फायदा होईल. | ३९ / ऑगस्ट | १४८२ / २२/०८/२०१२ | मंजूर |
| ३७. | **श्री. रंगनाथ कारभारी औटी, यांजकडुनः-** प्र. क्र.६६, जुईनगर सेक्टर २४ मधील गणेशमंदिर रोड रेल्वे पटरीच्या (लाईन) उत्तर दक्षिण रोड नवीन असल्यामुळे त्याची नवीन पदपथ करणे. | ४० / ऑगस्ट | १४८३ / २२/०८/२०१२ | मंजूर |
| ३८. | **श्री. रंगनाथ कारभारी औटी, यांजकडुनः-** प्र. क्र.६६, मधील चिंचोली तलाव गार्डन से.२४ मध्ये नागरिकांना बसण्यासाठी व गणपती विसर्जन उपयोगी शेड नवीन करणे. | ४१ / ऑगस्ट | १४८४ / २२/०८/२०१२ | मंजूर |
| ३९. | **श्री. रंगनाथ कारभारी औटी, यांजकडुनः-** प्र. क्र.६६, मधील आंबेडकर गार्डन से.२५ व चिंचोली तलाव गार्डन सें.२४ मध्ये नागरिकांना बसवण्यासठी व गणपती विसर्जन उपयोगी शेड नवीन करणे. | ४२ / ऑगस्ट | १४८५ / २२/०८/२०१२ | मंजूर |